

# रणधुमाळी
लोकसभा 2024



# कायदेशीर निर्णयांमुळे निवडणुका मजबूत, सक्षम अन् समृद्ध




अक्षत खेतान,
कॉर्पोरेट आणि कायदेशीर सल्लागार

निवडणुका या सर्वसाधारणपणे देशभरातील नागरिकांच्या एकत्रीकरणाचा एक महाउत्सव असतो. भारतात निवडणुका निव्वळ राजकीय प्रक्रियेपेक्षाही अधिक अशी मोठी घडामोड असते. ती जणू काही एखाद्या सणासारखी आहे. एक अब्जाहून अधिक लोकांच्या सामूहिक इच्छा आणि आकांक्षेच्या उत्सवाचे जणू काही ती निदर्शक होय. भव्यदिव्य आकार, विविधता आणि जटिलता या वैशिष्ट्यांनी सजलेल्या भारताचा निवडणूक प्रवास हा ऐतिहासिक कायदेशीर निर्णयांच्या मालिकेने आणखी समृद्ध झाला आहे आणि तिला मजबूतही केले आहे. भारताच्या लोकशाहीला आकार देण्यात, तिचा पाया आणखी मजबूत करण्यात न्यायव्यवस्थेच्या निवडणूक प्रक्रियेत निष्पक्षता, पारदर्शकता आणि सर्वसमावेशकता सुनिश्चित करण्यात या निकालांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावलेली आहे. कायदेशीर प्रक्रियेचे निराकरण करणारी अनेक प्रकरणे समोर आली असली तरी, अशी पाच प्रकरणे आहेत जी भारताच्या निवडणूक प्रक्रियेला कल देणारी आधारस्तंभ म्हणून उभी आहेत.



## मतदानाचा अधिकार; मूलभूत अधिकाराला बळकटी



भारतात निवडणूक आधारित लोकशाहीच्या केंद्रस्थानी संविधानात समाविष्ट केलेला मतदानाचा मूलभूत अधिकार आहे. गेल्या काही वर्षांत, न्यायव्यवस्थेने विविध कायदेशीर घोषणांद्वारे या अधिकाराची पुष्टी केली आहे आणि त्याचे संरक्षणसुद्धा केलेले आहे. मोहिंदरसिंग गिल विरुद्ध मुख्य निवडणूक आयुक्त यांच्या १९७७ च्या ऐतिहासिक खटल्यात, सर्वोच्च न्यायालयाने मतदानाचा अधिकार हा मूलभूत अधिकार असल्याचे स्पष्ट केले आणि या अधिकारापासून कोणालाही मनमानीपणे वंचित ठेवणे घटनाबाह्य असल्याचे मत मांडले. निवडणूक कायदे संभाव्यतः मतदानाच्या मूलभूत अधिकाराचे उल्लंघन करू शकतात, हे या प्रकरणातील आव्हान प्रामुख्याने निवडणूक कायद्यांची संवैधानिक वैधता ठरवण्याबाबत होते आणि त्यासाठी न्यायालयाला नागरिकांच्या लोकशाही अधिकारांच्या संरक्षणासह निवडणूक नियमनाची गरज संतुलित करणे आवश्यक होते. निकालामुळे निवडणुकांचा पाया रचताना मतदानाच्या अधिकाराचे अभेद्य स्वरूप स्थापित झाले.

## निवडणूक सुधारणा आणि पारदर्शकता



निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता आणि उत्तरदायित्व सुनिश्चित करणे ही सतत चालणारी प्रक्रिया आहे. गैरप्रकारांना आळा घालणे आणि निवडणूक अखंडतेला चालना देणे, हा यामागील उद्देश असून, या प्रक्रियेला न्यायिक हस्तक्षेपातून मार्गदर्शन लाभलेले आहे. असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स वि. युनियन ऑफ इंडिया हे २००२ मधील प्रकरण भारताच्या निवडणूक प्रवासातील एक महत्त्वपूर्ण टप्पा मानला जातो.


राजकीय उमेदवारांच्या गोपनीयतेच्या अधिकाराचा जनतेच्या माहितीच्या अधिकाराशी ताळमेळ साधण्याचे आव्हान एक प्रकारे या प्रकरणाने दिले. निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता आणि वैयक्तिक गोपनीयतेच्या अधिकारांमधले नाजूक संतुलन आवश्यक असल्याचे या प्रकरणातून पुढे आले. सर्वोच्च न्यायालयाने शिक्षण, गुन्हेगारी पार्श्वभूमी, आर्थिक संपत्ती आणि निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या जबाबदाऱ्यांशी संबंधित माहिती उघड करण्याच्या उच्च न्यायालयाच्या निर्णयावर शिक्कामोर्तब केले.

## सर्वसमावेशक प्रतिनिधित्व आणि अल्पसंख्याकांचे हक्क



भारतातील वैविध्यपूर्ण सामाजिक जडणघडण पाहता निवडणुकीच्या आखाड्यात सर्वसमावेशक प्रतिनिधित्व आणि अल्पसंख्याकांच्या हक्कांचे संरक्षण आवश्यक आहे. या तत्त्वांचे समर्थन करण्यासाठी आणि समाजातील सर्व घटकांना समान सहभाग सुनिश्चित करण्यासाठी कायदेशीर निर्णय महत्त्वपूर्ण ठरले आहेत. मंडल आयोग प्रकरण म्हणून प्रसिद्ध असलेल्या १९९२ च्या इंद्रा साहनी विरुद्ध युनियन ऑफ इंडियाच्या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने सरकारी नोकऱ्या आणि शैक्षणिक संस्थांमध्ये सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गीयांसाठीच्या जागांचे आरक्षण कायम ठेवले. हे प्रकरण सकारात्मक कृती आणि आरक्षण धोरणांच्या मुद्द्याशी जोडलेले आहे आणि ते संविधानात असलेल्या समानतेच्या तत्त्वांसह उपेक्षित समुदायांच्या न्याय्य प्रतिनिधित्वाच्या गरजेचा समतोल साधत आहे. या ऐतिहासिक निर्णयाने सर्वसमावेशक प्रतिनिधित्व, उपेक्षित समुदायांचे सक्षमीकरण आणि निवडणूक प्रक्रियेत सामाजिक न्याय वाढवण्याची वचनबद्धता अधोरेखित झाली.

## निवडणूक विवादांचे निराकरण



निवडणुकीचे पावित्र्य राखण्यासाठी आणि लोकशाही प्रक्रियेवर जनतेचा विश्वास टिकून राहण्यासाठी निवडणूक विवादांचे प्रभावी निराकरण आवश्यक आहे. निवडणूक तंटे आणि तक्रारींचा निवाडा करण्यासाठी मजबूत यंत्रणा उभारण्यात कायदेशीर निर्णयांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावलेली आहे. २०१३ च्या लोक प्रहरी विरुद्ध भारतीय संघ या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने निवडणुकीशी संबंधित विवादांचे जलद गतीने निराकरण करण्यासाठी, वेळेवर न्याय देण्याचे महत्त्व आणि निवडणूक प्रकरणांमध्ये कायद्याची अंमलबजावणी या मुद्द्यांचे समर्थन केले. राजकीय उमेदवारांची गुन्हेगारी पार्श्वभूमी आणि आर्थिक माहिती उघड करणे, उमेदवारांच्या अधिकारांचे अवाजवी उल्लंघन न करता किंवा त्यांच्या गोपनीयतेशी तडजोड न करता निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता आणि उत्तरदायित्व सुनिश्चित करणे हे या प्रकरणातील अनोखे आव्हान होते. या निकालाने निवडणूक प्रक्रियेची विश्वासार्हता वाढवताना विवादांचे निराकरणाची खात्री दिली.

## निवडणूक अधिकार आणि स्वातंत्र्यांचे संरक्षण



निवडणूक प्रक्रियेच्या अखंडतेसाठी निवडणूक अधिकार आणि स्वातंत्र्यांचे रक्षण करणे आत्यावश्यक आहे. या अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी आणि कोणत्याही उल्लंघनासाठी अधिकाऱ्यांना जबाबदार धरण्यासाठी कायदेशीर निर्णय महत्त्वपूर्ण ठरले आहेत. २०१५ च्या मोहम्मद सत्तार विरुद्ध राजस्थान राज्य या प्रकरणात राजस्थान उच्च न्यायालयाने कैद्यांच्या मतदानाच्या अधिकाराची पुष्टी केली. कारावासामुळे व्यक्तींना त्यांच्या मूलभूत अधिकारांपासून वंचित ठेवता कामा नये आणि या मूलभूत अधिकारामध्ये निवडणूक प्रक्रियेत सहभागी होण्याच्या अधिकाराचा समावेश असल्याचे स्पष्ट केले. हे प्रकरण कैद्यांसाठी मतदान सुलभ करताना कैद्यांची वाहतूकव्यवस्था आणि त्यातून उभे राहणारे प्रशासकीय आव्हाने यांना संबोधित करताना तुरुंगात असलेल्या व्यक्तींच्या निवडणूक अधिकारांचे समर्थन करण्याकडे लक्ष केंद्रित करते. मतदानाचा अधिकार तुरुंगवासामुळे अवास्तव प्रतिबंधित होणार नाही, याची खात्री करणे हा या न्यायिक प्रकरणाचा उद्देश होता.